महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ ४७४६
दिनांक : ३०/०८/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणू (कोविड - १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Levels of Restrictions for Breaking the Chain " प्रतिबंधात्मक आदेश.
श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव २०२१ बाबत मार्गदर्शक सूचना

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई यांचे परिपत्रक क्र.आरएलपी-०८२१/प्रक्र १९६/विशा१-ब दिनांक ३०.०८.२०२१ रोजीचे परिपत्रक.

मे. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांनी संदर्भ क्र.४ चे परिपत्रकान्वये **श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव २०२१** बाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार या वर्षी **श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव २०२१** साध्या पद्धतीने साजरा करणेबांबत सूचित करण्यात आले आहे. सदर परिपत्रक यासोबत संलग्न केले आहे. तरी या वर्षी **श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव २०२१** मे.महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/ मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोरपणे पालन करून **श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव** साध्या पद्धतीने साजरा करण्यात यावा.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.३०.०८.२०२१ रोजी दिलेला आहे.

स्वाक्षरी/xxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित...

निर्गमित

Ravi
( रविंद्र बिनवडे )
अतिरिक्त महापालिका आयुक्त ( ज )
पुणे महानगरपालिका
30/8/2021

श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी)
उत्सव- २०२१ बाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग.**
**परिपत्रक क्रमांक- आरएलपी- ०८२१/प्र.क्र.१९६/विशा- १ ब**
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ३० ऑगस्ट, २०२१.

<u>परिपत्रक</u>

यावर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमी दि. ३० ऑगस्ट रोजी तसेच गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव दि. ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

कोविड संसर्गामुळे मागील वर्षापासून विविध उपक्रम, कार्यक्रम, सार्वजनिक उत्सव, सण अत्यंत साधेपणाने साजरे करण्यात आले आहेत. कोरोनाची दुसरी लाट ओसरली असली तरी अजुनही कोरोनाचा धोका कायम आहे. भविष्यात कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता असल्याचे मत आरोग्य तज्ञांनी वर्तविले असून तसेच सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्राालय, भारत सरकार यांचे D.O.No. Z.२८०१५/१३८/२०२१-DM Cell, दिनांक २७.८.२०२१ च्या पत्राान्वये सर्वांनी आरोग्याच्या दृष्टीकोनातून योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यादृष्टीने मागील वर्षीप्रमाणे यावर्षी देखील श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत.:-

१. मागील वर्षीप्रमाणे यावर्षी देखील श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) हा उत्सव साधेपणाने आपआपल्या घरी पुजा-अर्चा करुन साजरा करावा.
२. श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहिहंडी) च्या दिवशी कोणत्याही प्रकारे सार्वजनिक पुजा-अर्चा अथवा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ नये. त्या ऐवजी हा उत्सव प्रतिकात्मक स्वरुपात साजरा करावा व पुजा-अर्चा तसेच कार्यक्रमांचे केबल नेटवर्क अथवा ऑनलाईन प्रक्षेपण उपलब्ध करुन देण्याबाबत व्यवस्था करण्यात यावी .
३. गोपाळकाला (दहिहंडी) च्या दिवशी अनेक सार्वजनिक मंडळे दहिहंडीचे आयोजन करत असतात. परंतू, कोविड-१९ चा प्रादूर्भाव वाढु नये, याकरीता गर्दी टाळण्यासाठी आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारे दहिहंडी उत्सव एकत्रित येऊन साजरा करु नये.

४. दहिहंडीसाठी मानवी मनोरे उभारताना शरीराचा संपर्क येत असल्याने कोरोनाचा वेगाने प्रसार होऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही प्रकारे सार्वजनिक ठिकाणी मानवी मनोरे उभारुन दहिहंडी साजरी करु नये. त्याऐवजी रक्तदान शिबीरे, आरोग्य शिबीरे असे उपक्रम राबविण्यात यावेत. तसेच त्या ठिकाणी मास्क, हॅन्ड सॅनिटायझर इत्यादीचा वापर, सोशल डिस्टन्सींगचे पालन तसेच स्वच्छतेच्या नियमांकडे विशेष लक्ष द्यावे.

५. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या दिनांक २७.८.२०२१ च्या पत्रान्वये आगामी दहिहंडी व गणेशोत्सव सारख्या सणांमध्ये नागरीक एकत्र आल्यास त्याठिकाणी अचानकपणे कोविड-१९ च्या केसेस मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे या उत्सवांमध्ये सामुहिकरित्या एकत्र येण्यावर कडक निर्बंध लागू करणे महत्त्वाचे आहे. तसेच नागरीकांनी कोविड-१९ च्या अनुषंगाने दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची ढिलाई झाल्यास आजपावेतो साथीच्या रोगाचे व्यवस्थापन करण्यास मिळालेली प्रेरणा कमी होऊ शकते. त्यासाठी दहिहंडी अथवा गणेशोत्सव यासारखे सामुहिकरित्या साजरे होणारे सण यावर्षी कोणत्याही प्रकारे एकत्र येऊन साजरे करू नयेत, अशा सूचना केंद्र शासनाकडून देण्यात आल्या असून त्याचे तंतोतंत पालन करणे अत्यावश्यक आहे.

६. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, Dated: ४th June २०२१, १७th June, २०२१, २५th June, २०२१ तसेच No. Corona-२०२१/C.R.३६६/Arogya-५, दि. २ ऑगस्ट, २०२१ व ११/८/२०२१ अन्वये लागू करण्यात आलेले Level of Restrictions for Breaking the Chain आणि सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार इतर निर्बंध कायम राहतील. सदर परिपत्रकांमध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. त्यामध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला (दहिहंडी) निमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.

७. कोविड-१९ या विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला (दहिहंडी) सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२१०८३०१६५७२३४८२९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sanjay Dagadu Khedekar

Digitally signed by Sanjay Dagadu Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a53701d2758331055dd3c46d615f8367912b1c64cd218e709c1b4de20bdf4f85, cn=Sanjay Dagadu Khedekar
Date: 2021.08.30 17:00:21 +05'30'

**(संजय खेडेकर)**
उप सचिव, गृह विभाग.

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१०. सर्व पोलीस आयुक्त.
११. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. सर्व जिल्हाधिकारी.
१३. सर्व पोलीस अधीक्षक.